# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 14/06/2023 (बुधवार) सकाळ


### अतिप्रसंग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. नरखेड** :— यातील फिर्यादी/पिडीता यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. नरखेड येथे अप. क्र. ६४/१६ कलम ३७६(२) (जे), ३४२, ५०६ भादवि. सहकलम ४ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

यातील विधीसंघर्ष बालक याने फिर्यादीला तुझ्याशी बोलायचे आहे असे म्हणुन घरी बोलावुन घरातील बेडरूममध्ये नेवुन दार बंद करून, अन्यायाने कैदेत ठेवुन फिर्यादीसोबत जबरी संभोग केला. तसेच याबाबत कुणाला काही सांगीतले तर जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणाचे तपास पोलीस निरीक्षक दिलीप मसराम पो.स्टे. नरखेड यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. डी. जे. ०१ श्री. आझमी सो. कोर्टामध्ये सादर केले. आज दिनांक १४/०६/२०२३ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. आझमी सा. नागपूर यांनी वरील नमुद आरोपीस कलम ३७६(२) भादवि व कलम ४ पोक्सो मध्ये १० वर्ष सश्रम कारावास व १०,०००/—रू. दंड दंड न भरल्यास ४ महिने साधा कारावास तसेच कलम ३४२ भादवि. मध्ये ३ महिने सश्रम कारावास व १०००/—रू. दंड, दंड न भरल्यास १ महिना साधी कैद अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्रीमती माधुरी मोटघरे मॅडम यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन पोहवा/१२०४ सुरेद्रसिंग ठाकुर पो.स्टे. नरखेड यांनी मदत केली आहे.

### घरफोडी

**पो.स्टे. नरखेड** :— अंतर्गत ०५ कि.मी. अंतरावरील बेलोना येथे दिनांक १२/०६/२०२३ चे रात्री ०.०० वा. ते दिनांक १३/०६/२०२३ चे ०३.०० वा. रात्री दरम्यान फिर्यादी नामे— सौ. प्रतिभा योगेश घोरसे, वय ३५ वर्ष, रा. मौजा बेलोना, ता. नरखेड ही दिनांक १२/०६/२०२३ रोजी आपले परीवारासह जेवण करून रात्री १२/०० वा. दरम्यान सर्व जण झोपी गेले होते दि. १३/०६/२०२३ रोजी रात्री ०२/४५ ला फिर्यादीला जाग आली असता घरातील लाइट बंद दिसले, फिर्यादी व फिर्यादीचे पती दोघेही उठुन किचन रूममध्ये ठेवलेले लोखंडी कपाटाचे दार उघडे दिसले व कपाटातील सामान अस्ताव्यस्त खाली पडलेले दिसले तसेच फिर्यादी हिने किचन ओटयावर पडुन असलेल्या पर्समध्ये पाहिले असता त्या पर्समध्ये ठेवलेले १) सोन्याचे २० ग्रॅमचे लॉकेट किंमती प्रत्येकी ३०००/— रू, ग्रॅम प्रमाणे एकुण ६००००/—रू तसेच २) सोन्याचे एक ७ ग्रॅमची गोल मन्याची पोथ किंमती प्रत्येकी ३०००/—रू ग्रॅम प्रमाणे एकुण २१०००/—रू ३) सोन्याचे एक ७ ग्रॅमची गोल मन्याची पोथ किंमती प्रत्येकी ३०००/—रू ग्रॅम प्रमाणे एकुण २१०००/—रू, ४) एक सोन्याची ०५ ग्रॅमची बदामी अंगठी प्रत्येकी २५००/— रू प्रमाणे १२५००/— रू. व नगदी ९०००/— रू असा एकुण १,२३,५००/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक राम शंकरराव ढगे, पोस्टे नरखेड मो. नं. ९५१८९७९४९९ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर